# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
# पिंपरी ४११ ०१८

## जाहीरात क्रमांक १२६५/२०२१ चे अनुषंगाने जाहीर निवेदन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, सांख्यिकी सहाय्यक, लॅब टेक्निशियन, एक्स रे टेक्निशियन, फ़ार्मासिस्ट व ए.एन.एम. अभिनामाची रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. सदरच्या अर्ज केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसंदर्भात या निवेदनाद्वारे पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१.उपरोक्त पदांकरीता **शनिवार दिनांक २५/०६/२०२२ रोजी दोन शिफ्टममध्ये सकाळी ९.०० ते १०.३० व दुपारी १२.३० ते २.०० या वेळेत ऑनलाईन परिक्षा** घेण्यात येणार असून त्याबाबतची प्रवेशपत्रे (Admit Card) महापालिकेच्या www.pcmc.india.gov.in या संकेतस्थळावर अलहिदा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

२.प्रवेशपत्र(Admit Card)उपलब्ध करुन घेणेकरीता उमेदवारांनी ऑनलाईन फॉर्म भरतेवेळी नमूद केलेल्या ई-मेल वर त्यांचा परिक्षा क्रमांक पाठविण्यात येणार आहे. महापालिकेच्या वरील संकेतस्थळावरील भरती (Recruitment) या लिंकवर तसेच होमपेजवर आमच्या बद्दल (About) ➔ नोकरी विषयक(Recruitment) या मेनूमध्ये लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या लिंकमध्ये उमेदवारांनी परिक्षा क्रमांक व त्यांची जन्मदिनांक नमूद करुन ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र(Admit Card) उपलब्ध करुन घ्यावे व प्रवेशपत्रासोबत असलेल्या उमेदवारांसाठी महत्वपूर्ण सुचनांचे वाचन करुन त्यातील कागदपत्रे सोबत आणावीत,तसेच प्रवेशपत्रावर (Admit Card) नमूद केलेले परिक्षा केंद्रावर व वेळेत ऑनलाईन परिक्षेसाठी उपस्थित रहावे.

३.संकेतस्थळावरुन ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) उपलब्ध करुन घेणे,परिक्षेस वेळेवर उपस्थित राहणे ही संबंधित उमेदवारांची जबाबदारी आहे. संकेतस्थळावरील प्रवेशपत्र पाहिले नाही, अथवा डाऊनलोड करणेस अडचण आली इत्याही कारणे ऑनलाईन परिक्षेचे वेळेस विचारात घेतली जाणार नाहीत.

४.ऑनलाईन परिक्षेचे स्वरुप हे मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रत्येकी २५ प्रश्न याप्रमाणे १०० प्रश्न असतील व एका प्रश्नांकरीता प्रत्येकी ०२ गुण याप्रमाणे २०० गुणांची परिक्षा असेल.

५.पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत ऑनलाईन परिक्षा केंद्राची संख्या मर्यादीत आहे.तसेच सदर परिक्षा ही उमेदवार संख्या जास्त असलेने दोन शिफ्टमध्ये होणार आहे,त्यामुळे उमेदवारांनी ऑनलाईन फॉर्म भरतेवेळी अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यांचे अनुषंगाने परिक्षा केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. त्याच परिक्षा केंद्रामध्ये उमेदवारांस ऑनलाईन परिक्षा देणे बंधनकारक आहे,उमेदवारांस कोणत्याही कारणास्तव परिक्षा केंद्र बदलून मिळणार नाही.

६.जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक अर्हतेनुसार काही उमेदवारांनी एकापेक्षा अधिक पदास ऑनलाईन अर्ज केले आहेत. एकापेक्षा अधिक पदांस अर्ज केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा एकदाच घेण्यात येणार असून, एका पदासाठीचे परिक्षेस प्राप्त केलेले गुण हे त्या उमेदवारांनी अर्ज केलेल्या अन्य पदांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत, तथापी उमेदवारांचे शैक्षणीक अर्हतेच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरच,त्यांचे नियुक्तीबाबत अलहिदा निर्णय घेण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

०५/०६/२२

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

क्रमांक - प्रशा/१/कावि/ २७८ /२०२२
दिनांक ०५/०६/२०२२